# शालिमार पेंट्सच्या महसुलात वाढ

मुंबई. शालिमार पेंट्स ह्या प्रतिष्ठित पेंट निर्मात्यांनी नुकतेच २०१८-१९ ह्या वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. ह्या तिमाहीत कंपनीने स्थिर वाढ साध्य केली आणि एकत्रित उत्पन्नात दुसऱ्या तिमाहीतील ७२.१ कोटी रुपयांवरून तिसऱ्या तिमाहीत ७५.४ कोटींपर्यंत वाढ झाली. २०१७-१८ मधील संबंधित कालावधीतील ६६.७ कोटी रु.च्या तुलनेत कंपनीने १३% ची लक्षणीय वाढ नोंदवली आहे.

अहवालानुसार, २०० कोटींच्या आसपास, राईट्स इशू नुकताच बंद करण्यात आला. कंपनीने घोषित केलं की मैलाचा दगड ठरणारा नाशिकचा प्रकल्प, २०१९-२० च्या पहिल्या तिमाहीमध्ये परत लाँच केला जाणार आहे. त्यामुळे, शालिमार पेंट्सने अतिरिक्त क्षमता आणि पश्चिम भारतातील अधिकच्या मागणीसाठी तयारी केली आहे.